# घोषणा

# महाराष्ट्र वन सेवा (पूर्व) परीक्षा - २०१६

# निकाल

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ३ एप्रिल, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा (पूर्व) परीक्षा-२०१६ या परीक्षेचा निकाल दिनांक २१ जून, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व गुणांची सीमारेषा आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

(१) Forest science या विषयातील M. Sc.पदव्युत्तर पदवीधारक उमेदवारांची अर्हता तपासण्याच्या अधिन राहून त्यांची पदवी "वनशास्त्र" पदवीधारकांसाठी ५% आरक्षित असलेल्या पदांकरिता उमेदवारी ग्राहय धरण्यात आली आहे.

(२) प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवाराने ऑन लाईन पध्दतीने केलेल्या पूर्व परीक्षेच्या अर्जातील माहितीच्या आधारे त्यांची पात्रता तपासणीच्या अटीच्या अधिन राहून मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल व या तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

(३) प्रस्तुत परीक्षेची मुख्य परीक्षा **दिनांक १४ ऑगस्ट, २०१६** रोजी **मुंबई केंद्रावर** घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने अधिसूचना लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

(४) मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या SMS द्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**दिनांक- २१ जून, २०१६**

**ठिकाण- मुंबई**

विजया पडते
उपसचिव(परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.